# ज.ए.इ. ची पूर्व प्राथमिक शाळा (सुभेदार वाडा) कल्याण (प.)

## ✻ वार्षिक अहवाल डिसेंबर २०१४- डिसेंबर २०१५ ✻

सस्नेह नमस्कार!

जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटची पूर्व प्राथमिक शाळा, सुभेदार वाडा, गांधी चौक, कल्याण(प.) आपला वार्षिक अहवाल सादर करीत आहे.

✻ नोव्हेंबर १९८४ साली जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटची पूर्व प्राथमिक शाळा, कल्याण मधील सुभेदार वाड्यात सुरु झाली. सध्या शाळेच्या पूर्व प्राथमिक विभागात मोठा शिशुवर्गाचे ४ वर्ग, छोटा शिशुवर्गाचे ४ वर्ग आणि नर्सरीचा १ वर्ग असून एकूण ४३४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेत एक मुख्याध्यापिका, आठ शिक्षिका, एक संगीत शिक्षिका, एक लेखनिक, तीन सेविका व १ हंगामी शिक्षिका व २ हंगामी सेविका कार्यरत आहेत. त्यामुळे शाळेचे शैक्षणिक नियोजन व्यवस्थित होते.

✻ शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावे म्हणून विविध सण, उत्सव साजरे केले जातात. उदा. दीपपूजा, रक्षाबंधन, बैलपोळा, नागपंचमी, दही हंडी, संक्रांत (तिळगुळ समारंभ), शेकोटी, भोंडला, दसरा, रंगपंचमी, होळी इत्यादी. दर चार महिन्यांनी विद्यार्थ्यांचे सामुहिक वाढदिवस होमहवन करुन 'गायत्री मंत्र' म्हणून साजरे केले जातात.

✻ जुलै महिन्यापासून दर बुधवारी विद्यार्थ्यांना पौष्टिक खाऊ दिला जातो.

✻ चिन्मय मिशन गीता पठण स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली.

१) कु. विदिशा जठार - तृतीय क्रमांक.

२) कु. चैत्राली जठार - उत्तेजनार्थ

३) कु. मनस्वी चव्हाण - उत्तेजनार्थ

✻ झपूर्झा कला क्रिडा साहित्य संस्था व जायन्टस ग्रुप ऑफ कल्याण तर्फे घेण्यात आलेल्या रंगभरण स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली.

१) कु. देवेन शिंपी - उत्तेजनार्थ

२) कु. प्रणय पवार - उत्तेजनार्थ

✻ अथर्व ट्रस्ट डोंबिवली तर्फे घेण्यात आलेल्या रंगभरण स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली.

१) कु. श्रृती मेंगाळ - कलाअविष्कार
२) कु. अनिशा भिसे - कलाअविष्कार
३) कु. प्राजक्ता काटकर - कलाअविष्कार
४) कु. संजना धोंगडे - कलाअविष्कार
५) कु. अथर्व खटावकर - प्रथम क्रमांक कलारत्न

* ३ चाकी सायकल स्पर्धा जायंटस् ग्रुप ऑफ कल्याण तर्फे घेण्यात आल्या त्यात कु. रोशन संजय खोमणे यास प्रथम क्रमांक व रु. ५००/- रोख मिळाले.
* नवनीत तर्फे घेण्यात आलेल्या मास्टर स्टॉक या स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांना पारिताषिके मिळाली. १) कु. देवेश फडके, २) कु. चैत्राली जठार, ३) कु. निलाक्षी जानवे, ४) कु. स्वराज चौधरी, ५) कु. चैतन्य जाधव, ६) कु. प्राप्ती पाठारी.
* महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ इको फोकस आणि रचना कला केंद्र यांच्या संयुक्त विद्यमानाने घेण्यात आलेल्या 'फळांची कहाणी' या बालनाटकास उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. या नाटकाचे लेखन, दिग्दर्शन व नेपथ्य सौ. नीता रामतीर्थ (शिक्षिका) यांनी केले.
* माघी गणेशोत्सवानिमित्त अक्षत गणपती गांधी चौक येथे विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम करण्यात आले या वेळी कु. चार्वी ढवळे हीचा रिंग डान्सही झाला. अक्षत गणपती ट्रस्ट तर्फे विद्यार्थ्यांना बक्षिसे व खाऊ देण्यात आला.
* दीपपूजेच्या वेळी दीपोत्सवाबरोबरच साईबाबांची मठी तयार करण्यात आली होती. तसेच तीळगूळ समारंभानिमित्त पतंगाची सजावट करण्यात आली होती.
* विद्यार्थ्यांची सहल दि. ९ जानेवारी २०१५ रोजी 'हर्मनी व्हिलेज' बदलापूर येथे नेण्यात आली.
* महिला दिनानिमित्त बालक मंदिर शाळा, कल्याण येथील शिक्षिका सौ. माळी मॅडम यांचे दि. ९ एप्रिल रोजी 'आपण स्वतःला जरासे बदलू या' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.
* मोठा शिशु विद्यार्थ्यांचा 'निरोप समारंभ' दि. १ एप्रिल रोजी करण्यात आला.
* मोठा व छोटा शिशुची लेखी व तोंडी परीक्षा दि. २५/०३/१५ ते ०९/०४/२०१५ या कालावधीत घेण्यात आली.
* लो. टिळक पुण्यतिथी निमित्त पुढील स्पर्धांचे आयोजन केले होते.
  छोठा शिशु-बेडूक उड्या, मोठा शिशु-वही डोक्यावर घेऊन चालणे.
  नर्सरी - कमरेवर हात ठेवून उडी मारणे.

* वृक्षसंवर्धन दि. २० जुलै व्यवसाय व कारागीर आठवडा दि. ७ सप्टेंबर तसेच पौष्टिक आठवडा दि. ५ ऑक्टोबर रोजी हे उपक्रम राबवण्यात आले.
* शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांच्या बौद्धिक स्पर्धा ५ सप्टेंबर रोजी घेण्यात आल्या. ५ मिनिटात जास्तीत जास्त वाक्प्रचार लिहिणे. या स्पर्धेत शाळेतील शिक्षकांना खालीलप्रमाणे बक्षिसे मिळाली.

  प्रथम क्रमांक - सौ. रश्मी दिघे

  द्वितीय क्रमांक - सौ. विद्या राणे

  तृतीय क्रमांक - श्रीमती वैशाली देवळे

  उत्तेजनार्थ - १) सौ. जयश्री सोनार, २) सौ. अपर्णा पुराणिक
* दरवर्षी प्रमाणे शारदोत्सव ४ दिवस साजरा करण्यात आला. यात देवीची स्थापना, मुलींचा भोडला व पालकांचा भोंडला, विद्यार्थ्यांची वेशभूषा, दसऱ्याच्या दिवशी पाटीपूजन इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन केले होते. तांदुळ देवी
* छोटा व मोठा शिशुची सहामही लेखी परिक्षा दि. २३/१०/१५ ते २८/१०/१५ या कालावधीत घेण्यात आली.
* 'दिवाळी पहाट' हा कार्यक्रम बालवाडी व प्राथमिक विभागातर्फे संयुक्तरित्या दि. ४ नोव्हेंबर रोजी साजरा करण्यात आला.
* वार्षिक क्रिडा स्पर्धा दि. ३ डिसेंबर १५ रोजी घेण्यात आल्या.
* शाळेतील ज्येष्ठ सेविका श्रीमती मुक्ता नाथा काकरे या दि. ३१ डिसेंबर २०१५ रोजी शाळेतून सेवानिवृत्त झाल्या.
* दरवर्षी प्रमाणे याही वर्षी दहीहंडी कार्यक्रमाचा खर्च आपल्या शाळेतील सेविका श्रीमती मुक्ता नाथा काकरे यांनी केला.
* नर्सरीच्या वर्गात मातृदिन व गणपती गौरी यांचे आगमन हे कार्यक्रम साजरे करण्यात आले.
* स्त्री शिक्षक मंडळ कल्याण यांच्या तर्फे आयोजित कै.डॉ. आनंदी गोपाळ जोशी यांच्या १५० व्या जयंती निमित्त, घेण्यात आलेल्या एकपात्री अभिनय स्पर्धेत आपल्या मुख्याध्यापिका सौ. रसिका यशवंत जांभुळकर यांना तृतीय क्रमाकांचे व रु. २५१/- रोख पारितोषिक मिळाले.
* ज.ए.इ. कर्मचारी संघातर्फे घेण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धेत सौ. रश्मी रवि किरण दिघे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. शिवसेना पक्षातर्फे घेण्यात आलेल्या 'खेळ मांडियेला' या

कार्यक्रमात श्री. आदेश बांदेकर यांनी सदर केलेल्या होम मिनिस्टर खेळात सहभागी झाल्याबद्दल सौ. नीता राजन रामतीर्थ यांना पारितोषिक मिळाले.

* शिक्षक पालक संघातर्फे विद्यार्थ्यांच्या स्पर्धा पुढील प्रमाणे घेण्यात आल्या.
नर्सरी-कांगारु उड्या मारणे, छोटा शिशु-मनोरा लावणे,
मोठा शिशु - सांगितलेली वस्तू आणणे.
तसेच मातृदिनानिमित्त प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागाच्या महिला पालकांची पाण्यातील काटेरी वांगे दाताने पकडून आणणे ही स्पर्धा दि. १२ सप्टेंबर रोजी घेण्यात आली. या स्पर्धेचे परिक्षण सौ. केतकी साफळे (प्राथ.शिक्षिका न्यू हायस्कूल) व सौ. नम्रता चौधरी (मुख्याध्यापिका मांडा टिटवाळा) यांनी केले. पुढील महिला पालकांना पारितोषिके मिळाली.
प्रथम क्रमांक - सौ. रंजीता नरेश गाडेकर
द्वितीय क्रमांक - सौ. विप्लवा दिपक जठार
तृतीय क्रमांक - सौ. सुषमा रविंद्र सुर्यवंशी
उत्तेजनार्थ - सौ. सुवर्णा अनिल गभाले.

* शाळेवरील प्रेमापोटी काही हितचिंतकांनी संस्थेकडे काही ठेवी ठेवलेल्या आहेत. त्यातूनच लो. टिळक पुण्यतिथी निमित्त घेण्यात येणाऱ्या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात येतात. तसेच श्री. घोष्टेकर यांनी श्रीकृष्णाची बालमूर्ती भेटस्वरुपात शाळेला दिली. वर्ग सजावटीसाठी श्री. खैरनार यांनी रु. २,०००/- रोख व श्री. भोईर यांनी रु. १,०००/- रोख दिले. माजी विद्यार्थी कु. प्राजक्ता राणे हिने सतरंज्यांवर शाळेचे नाव घालून दिले. कु. साक्षी मुकेश बुचंडे छोटा शिशु गट क्रमांक ४ या गरजू विद्यार्थीनीची शाळेची वर्षाची फी रु. ३,२२५/- (शैक्षणिक वर्ष २०१५-१६) शाळेतील सेविका श्रीमती मुक्ता नाथा काकरे यांनी भरली. या सर्वांची शाळा ऋणी आहे. अशाप्रकारे विशाल वटवृक्षाला समृद्धी व यशाच्या उत्तुंग शिखराकडे वाटचाल करण्यासाठी संस्था व शिक्षक सतत प्रयत्न करीत आहेत. त्यांना यश मिळावे ही ईश्वरचरणी प्रार्थना.
धन्यवाद!

**सौ. रसिका यशवंत जांभुळकर**
मुख्याध्यापिका
ज.ए.इ.ची पूर्व प्राथमिक शाळा, कल्याण (प.)

संकलन : श्रीमती वैशाली विवेक देवळे, सौ. विद्या राजेश राणे (सहाय्यक शिक्षिका)